पुण्य नगरी
■ बुधवार, १ ऑक्टोबर २०२५



# विवेकानंद कॉलेजमध्ये 'गरबा-दांडिया'

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कॉलेजमध्ये संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्र, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सचेतना मंडळ आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवरंगी नवरात्र उत्सवानिमित्त गरबा-दांडिया नृत्य स्पर्धा उत्साहात झाल्या. यामध्ये ज्युनिअर व सिनिअर कॉलेज गटातील तेरा संघांनी सहभाग नोंदवून बहारदार नृत्य सादरीकरण केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेतील गटनिहाय विजेते अनुक्रमे असे, सिनिअर कॉलेज गट : सांस्कृतिक विभाग विद्यार्थी ग्रुप, नीलम पुरोहित व ग्रुप, वृषाली पाटील व ग्रुप. ज्युनिअर कॉलेज गट : बीट बेकर्स ग्रुप, गुज्जू गाईज व ग्रुप, देसी गर्ल्स ग्रुप. परीक्षक म्हणून स्टीवन पौलस, नेहा भस्मे यांनी काम पाहिले. प्रास्ताविक डॉ. संपदा टिपकुर्ले, स्वागत प्रा. शिल्पा भोसले, सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. आभार डॉ. ए. एस. महात यांनी मानले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
● बुधवार, दि. १ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये बेसिक्स ऑफ मायसोल वर व्याख्यान

**जनप्रवास : कोल्हापूर**

येथील विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स् (एंटायर) विभागाच्या वतीने व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी बेसिक्स ऑफ MySQL या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून शिवराज कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अँण्ड सायन्स्, गडहिंग्लजचे प्रा.उमेश कानडे हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना डेटाबेस आणि RDBMS या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच आवश्यक कौशल्ये आणि बाजारातील मागणी विषयावर माहिती दिली. विविध कंपन्यातील नोकरीसाठी आवश्यक असणारी मुलाखतीची तयारी कशी करावी हे सांगितले.



या व्याख्यानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली बी.सी.एस. विभागाने केले होते. बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स् (एंटायर) विभागप्रमुख प्रा. पल्लवी देसाई यांनी प्रास्ताविक केले. प्रा. राजेश माने यांनी वक्त्यांची ओळख करुन दिली. प्रा.राधिका पाटील यांनी आभार मानले तर भार्गवी कुगजी यांनी सुत्रसंचालन केले. या व्याख्यानासाठी प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.